* एक कुल एक कुटुंब *

# बर्वे (बरवे) कुलवार्ता

।। श्री देव कोळेश्वर ।।    ।। श्री योगेश्वरी प्रसन्न ।।

Website : www.barvemandal.org


स्थापना १९९९    वर्ष १९ वे    अंक १ ला    दि ३१/१/२०१७

( खाजगी वितरण - बर्वे कुटुंबियांकरीता )

## नाशिक संमेलन २०१६ विशेष अंक




सुस्वागतम् - वार्षिक स्नेहसंमेलन



।। श्री योगेश्वरी प्रसन्न ।।



।। श्री देव कोळेश्वर ।।

* बर्वे मंडळीचे कौटुंबिक मुखपत्र *

सोसायटी ॲक्ट नोंदणी क्रमांक महा/७५९-२००१/ठाणे
पब्लिक ट्रस्ट ॲक्ट नोंदणी क्र. एफ/९८३४-ठाणे

# वार्षिक स्नेह संमेलन २०१६




(१) स्वागत व नांव नोदणी



संमेलनात स्वागतगीत सादर करताना
नाशिक मधील महिला कार्यकर्त्या



गायनाचा कार्यक्रमात गायक श्रीहरी बर्वे व
त्यांना पेटीसाथ देताना पराग बर्वे



मनोगत व्यक्त करताना
श्री. दिनकर द. बरवे - नाशिक (अध्यक्ष)



लघुरुद्र कार्यक्रम



प्रमुख पाहुणे श्री. सुबोध भावे
यांच्या हस्ते स्मरणिका प्रकाशन

# बर्वे (बरवे) कुल स्नेह संवर्धक मंडळ

सोसायटी ॲक्ट रजि. ७५९ दि. १८.०८.२००१ व
पब्लिक ट्रस्ट ॲक्ट रजि. नं. एफ्-९८३४ दि.. ३१-१०-२००१ **PAN No. AAATB 6706A**
द्वारा - श्री. नंदकुमार रा. बर्वे, ९ पुष्कराज सोसा., लोहार आळी, ठाणे - ४०० ६०१. दूरध्वनी क्र. : **२५३६९०४१**

## संपादकीय...

आपल्या मंडळाचे ३८ वे वार्षिक स्नेह संमेलन १२ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर २०१६ रोजी नाशिक येथील गोळे कॉलनीतील गद्रे सभागृहात साजरे झाले. या आधी २००१ व २००८ साली नाशिक येथे संमेलन झाले होते. त्याप्रमाणेच यावर्षीही हे संमेलन थाटात साजरे झाले.

जून २०१६ मध्ये आपल्या मंडळाचे सहकार्यवाह श्री. श्रीकांत बर्वे यांचे अकाली दुःखद निधन झाले. हे संमेलन नाशिक येथे घ्यावयाचे असे आधीच ठरले होते परंतू श्री. श्रीकांत बर्वे यांच्या निधनामुळे सर्वांना असे वाटले की, हे संमेलन आता नाशिक येथे होणार नाही. परंतू नाशिकचे शाखा अध्यक्ष श्री. दिनकरराव बर्वे (कै. श्रीकांत यांचे मोठे बंधू) समस्त नाशिककर बरवे मंडळी आणि कै. श्रीकांत यांचे नाशिकमधील नातेवाईकमंडळी यांनी कंबर बांधल्यामुळे हे संमेलन नाशिक येथेच पार पडले. पदोपदी कै. श्रीकांत यांची वारंवार आठवण येत होती. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कलाकार श्री. सुबोध भावे हे निमंत्रित होते व कलाकार असल्यामुळे वेळात वेळ काढून हजर होते. श्री. सुबोध भावे हे श्रीमती सुषमा ताईंचे (कै. श्रीकांत यांच्या पत्नीचे) भाचे. सुषमा आत्याला दिलेल्या शब्दाला मान ठेऊन हजर होते. संमेलनाचा पहिला दिवस युवा बर्वे मंडळींना प्रोत्साहन देण्यासाठी युवा संमेलन आयोजित केले होते. मागील ४/५ वर्षे आपण युवा संमेलन आयोजित करत आहोत. यावर्षीही युवा मंडळी उपस्थित होती व हे संमेलन यशस्वीपणे पार पडले. पुढील संमेलन कोठे होणार हे निश्चित झालेले नाही. परंतू बडोदा अथवा मुंबई येथे होण्याची शक्यता आहे. अलिकडेच सांगलीच्या मंडळींनी संमेलन सांगलीस करावे असा प्रस्ताव पुढे केला आहे. असो ! संमेलन कोठेही होओ ते त्रैमासिकातून समजेलच परंतू पुढील समेलनासही मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व युवकांनी पुढे होऊन आपली उपस्थित संख्या वाढवावी ही अपेक्षा.

मोदी सरकारने रु. १०००/- व रु. ५००/- च्या नोटाबंदी केल्यामुळे सामान्य भारतीय जनतेला त्रास झाला परंतु दूर दृष्टीने हे चांगले असेल तर थोडा त्रास सहन करुन सहकार्य करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच आहे. आता बँकांतून गर्दी कमी होत आहे. रोख व्यवहारापेक्षा डेबिट/क्रेडीट कार्ड अथवा ऑन लाईनद्वारेच्या माध्यमातून व्यवहार करणे चांगलेच आहे. परंतू सर्वांनाच ते जमते असे नाही. सर्वांनी ते समजून शिकून आचरणात आणले पाहिजे. तरूणांनी वृद्धांना याकामी मदत करणे (समजून देणे, शिकवणे ) गरजेचे आहे. बरीचशी तरुण मंडळी कामात मग्न असल्यामुळे त्यांनी वेळातवेळ काढून वृद्धांना योग्य मार्गदर्शन/शिक्षण दिले पाहिजे.

श्री देव कोळेश्वर व श्री योगेश्वरी देवी यांच्या कृपेने आपले हे ३८ वे संमेलन यशस्वी झाले. तसेच पुढील वर्षीचेही होओ ही प्रार्थना !

सर्व सभासदांना संक्रांत पर्व व नवीन वर्ष २०१७ सालच्या हार्दिक शुभेच्छा !

# असे झाले ३८ वे स्नेहसंमेलन

आपल्या बर्वे (बरवे) कुलस्नेहसंवर्धक मंडळाचे ३८ वे स्नेह संमेलन व वार्षिक सर्वाधारण सभा गद्रे मंगल कार्यालय, चितपावन ब्राह्मण सभा, गोळे कॉलनी, जुना अग्रा रोड, नाशिक येथे दिनांक १२ नोव्हेंबर व १३ नोव्हेंबर २०१६ रोजी साजरे करण्यात आले.

दिनांक १२ नोव्हेंबरचा कार्यक्रम हा युवकांचा कार्यक्रम म्हणून निश्चित केला होता व त्याची धुरा श्री. पराग रामानंद बर्वे(बरवे) याचेवर होती. या युवा संमलनाचे सुत्र संचालन कु. नेहा प्रशांत बरवे (पांडुर्ली) हिने केले. सुरुवातीस दिप प्रज्वलन व श्रीकोळेश्वर व श्रीयोगेश्वरी  देवीच्या प्रतिमेचे पूजन झाले. सौ. जया मनोहर बरवे व स्मिता रानडे यांनी स्वागत गीत म्हटले त्यानंतर शहरी व खेड्यातील तरूण उद्योजकांच्या मुलाखती घेतल्या. एक तरूण उद्योजक श्री. निलेश चंद्रशेखर बरवे हे BA झालेले असून ते वडिलांचा पारंपारिक शेती व्यवसायाबरोबर जोड व्यवसाय म्हणून भाजी व इतर वाणांची कोठुरे ते नाशिक अशी व्हॅनने वाहतूक करतात. सुरुवातीस वडिलांकडून भांडवल घेऊन त्यांनी छोटा ट्रक कम व्हॅन घेऊन हळूहळू एकाच्या दोन ट्रक-व्हॅन केल्या. तसेच एक छोटा ट्रॅक्सही खरेदी केला. कष्टाची तयारी असल्याने प्रगतीस वाव असल्याचे सांगितले. कोठुरे येथील दुसरे उद्योजक श्री. अतुल बबन बरवे हे किराणा मालाचे दुकान चालवतात. NMM कंपनीत नोकरीस होते. पण कंपनी बंद झाल्याने नोकरीवर कुऱ्हाड कोसळली. परिणामी मुळगांव कोठूरे येथे सहकुटुंब आले. प्रथम दुधाचा व्यवसाय करुन पाहिला पण जमले नाही. ते स्वतः औषध निर्माण पदविका धारक आहेत. त्यामुळे त्यांनी औषधाचे दुकान काढले व आता ते दुकान धाकटा भाऊ महेश यास चालविण्यास दिले आहे. स्वतः एका टपरीवर किराणा मालाचे दुकान टाकले व ते यशस्वीरित्या चालवत आहेत. प्रामाणिकपणा, कष्ट, गोडबोलणे व सतर्क राहणे असे केल्याने व्यवसाय व्यवस्थित करता येतो. पत्नी अक्षया हिची मोलाची साथ आहे. भाऊ महेशही औषधाचे दुकान नेकाने चालवतो. कोठुरे येथील आणखी एक उद्योजक अमोल अनंत बरवे व त्याचा धाकटा भाऊ अभिजीत हेही व्यवासाय करतात. अमोल ट्रॅक्टर चालवितो. वडिलांनी एक ट्रॅक्टर घेऊन दिला आहे. आता त्यांनी आणखीही एक ट्रॅक्टर घेतला आहे. शेतामध्ये नागरणी, कोळपणी करणे, पेरणी व औषध मारणे ही कामे तो करतो. सध्या गव्हासाठी जमिन तयार करणे चालू असल्याने तो येऊ शकला नाही. त्याचाच भाऊ अभिजीत हा वायरमन  व इलेक्ट्रीक मोटार वायडींगची कामे करतो. बाळकाकांनी (कै. श्रीकांत काका) त्याला हा व्यवसाय करण्यास उत्तेजन दिले असे तो आवर्जुन सांगतो. आणखी एक उदाहरण आम्हास दाखवावयाचे होते ते म्हणजे जिद्द व चिकाटी. श्री. निलेश गोपाळ बरवे यांनी शालांत परिक्षेनंतर I.T.I. बारावी मग डिप्लोमा व पदवी असे अभियांत्रिकेचे शिक्षण घेतले व पुढे पदव्युत्तर शिक्षण घेण्याची इच्छा आहे. परंतू संमेलनाच्या सुमारसच तो कंपनीतर्फे ऑस्ट्रेलियास गेला असल्याने त्याची मुलाखात घेता आली नाही.

पुढचे कार्यक्रम म्हणजे आसने. हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात व्यायामास सवड मिळत नाही. परिणामी खांदेदुखी, मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, सांधेदुखी असे आजार अकाली जवळ येतात. श्री. दिनकरराव बरवे यांनी दहा मिनिटात करण्यासारखी साधी आसने सांगितली आहेत. (ते स्वतः ती आसने नियमित करतात) सौ. अक्षया अतुल बरवे हिच्या मार्गदर्शनाखाली कु. रिद्धी महेश बर्वे व कु. पार्थ भट यांनी ही आसने करुन दाखविली.

या नंतर ज्या जोडप्यांची ५० वर्षे वा त्यापेक्षा जास्त वर्षे नेटानी संसार केला आहे अशांचा सत्कार करण्यात आला.

१) डॉ. मुकुंद दामोदर फाटक व सौ. निर्मला फाटक-बरवे
२) श्री. दिनकर दत्तात्रेय व सौ. वसुंधरा बरवे (५३ वर्षे)
३) श्री. गोपाळ व सौ. उज्वला बरवे (५२ वर्षे)
४) श्री. बबन व सौ. प्रतिभा बरवे (५२ वर्षे)
५) श्री. व सौ. पुरुषोत्तम दामोदर बर्वे (५६ वर्षे)

वरील सत्कार मुर्तींना पुरुषांना गणेश प्रतिमा व स्त्रियांना लक्ष्मीची प्रतिमा प्रत्येकी देण्यात आली. या कार्यक्रमानंतर चहापानाचा कार्यक्रम झाला.

पुढील कार्यक्रम आर्थिक गुंतवणुकीबद्दल करण्यात आला. श्री. नामजोशी व त्यांचे सहकारी यांनी गुंतवणुकीबद्दल माहिती दिली. संध्याकाळी स्लाईड शो द्वारा कोठूरे, डुबेरे, पांडुर्ली व पिंपळास या गावी बरवे घराण्यांचे आगमन व तेथे त्यांनी केलेल्या कामाबद्दलची माहिती देण्यात आली. स्लाईड शो चे संयोजन कु. केतन विश्वास, कु. स्वानंद विद्याधर पावणस्कर यांनी केले व निवेदन साक्षी अतुल बरवे हिने उत्कृष्टरित्या केले.

शेवटचा कार्यक्रम सादर करण्यात आला संगिताचा. श्री. पराग रामानंद बरवे- ईगतपूरी व कल्याणचे श्री. श्रीहरी बरवे यांचे गायन झाले. तबल्याला साथ स्वानंद विद्याधर पावणस्कर व पेटीवर साथ श्री. ठकार यांनी केली. नंतर भोजनाचा कार्यक्रम झाला. भोजनास खिचडी, भरीत, भाकरी व गुळाची पोळी होती.

दि. १३ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी ७ वाजतां श्री. विनायक साने गुरुजी व त्यांचे सहकारी यांनी लघुरुद्र केला. श्री. श्रीहरि बरवे व श्री. व सौ. पराग बर्वे हे ही अभिषेकास बसले होते. तसेच श्री. विश्वास विष्णु व सौ. प्राची विश्वासही बसले होते. सौ. अनिता गोखले यांनी खास मथुरेचे पेढे प्रसादासाठी आणले होते ते वाटण्यात आले. नंतर न्याहरी झाली.

न्याहरीनंतर वार्षिक सर्वसाधारण सभेला सुरवात झाली. स्वागत गीत सौ. प्राची विश्वास, सौ. स्मिता रानडे-बरवे, सौ. मृदुला प्रशांत व कु. प्राची अतुल यांनी सादर केले.

सौ. मनिषा म. बर्वे-मुलुंड या निवेदिका होत्या. सौ. मनिषा ताईंनी पाहुण्यांचे स्वागत केले. श्री. सुबोध भावे यांचा परिचय साक्षी बर्वे यांनी करुन दिला. सुबोध भावे यांचे हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन झाले.

नंतर व्यासपिठावर श्री. दिनकर व दतात्रय व सौ वसुंधरा यांना बोलवण्यात आले. श्री.दिनकरराव यांना

त्यांनी बरवे मंडळींसाठी केलेल्या अथक कामगिरी बद्दल "बर्वे कुलरत्न" पुरस्कार देऊन गौरवण्यात आले व सन्मानपत्रही देण्यात आले. श्री. दिनकररावांना आयुष्यभर साथ दिल्याबद्दल सौ. वसुंधरा दिनकर यांचाही शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. नंतर प्रमुख पाहुण्यांचाही सत्कार करण्यात आला. त्यांनी थोडक्यात भाषण करुन सर्वांचा निरोप घेतला. कार्यबाहुल्यामुळे ते ताबडतोब निघून गेले. नंतर इतर वक्त्यांची भाषणे झाली.

वर्षभरात मृत्यु पावलेल्या बांधवांना एक मिनिट उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली.

या वर्षी पुढील कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला–

१) गृहलक्ष्मी सन्मान - सौ मनिषा प्रशांत बर्वे -पांडुर्ली

२) अन्नपुर्णा सन्मान - सौ. जया मनोहर बरवे

३) आदर्श कार्यकर्ती - सौ. नीला विद्याधर पावणस्कर-बरवे

४) आदर्श कार्यकर्ता - श्री. पराग रामानंद बरवे

पारितोषक वितरणाचे सुत्रसंचालन सौ. वसुंधरा दिनकर यांनी केले. नंतर अहवाल वाचन करुन मंजूरी देण्यात आली. ऑडीटरची नेमणूक करण्यात आली.

तीन वर्षाचा कार्यकाळ पुर्ण झाल्याने नविन कार्यकारिणीची निवडणूक बिनविरोध पार पडली. श्री. धनंजय रामकृष्ण बरवे यांना अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. कार्यकारिणीत नाशिकहून दोन नवीन सभासद निवडण्यात आले. श्री. चंद्रशेखर बरवे व सौ. मृदुला प्रशांत बर्वे.

सर्व आजीमाजी केंद्रकारिणी सदस्यांना कै. श्रीकांत बर्वे यांची आठवण म्हणून मसाला शेंगदाणे व एक कापडी पिशवी देण्यात आली. शेंगदाणे श्री. श्रीकांत विष्णु यांनी पुरविले व सौ. वसुंधरा यांनी मसाल्याचे केले. यानंतर सभा बरखास्त झाली. नंतर जेवण देण्यात आले. त्यात उकडीचे मोदक हे पक्वान्न होते. जेवणाचा मेनू श्री. विश्वास विष्णु बर्वे व श्री. विद्याधर पावणस्कर यांनी ठरविला.

यंदाचे संमेलन नेटके व यशस्वी झाले. जेवण उत्तम होते असे सर्वांचे मत पडले. उपस्थिती कमी जाणवली. सहकार्यवाह कै श्रीकांत बरवे यांची उणीव प्रकर्षाने जाणवत होती. श्री. दि. द. बर्वे यांना भाषण करता करता गहिवरुन आले. त्यामुळे त्यांनी भाषण थोडक्यात आवरते घेतले. मध्यप्रदेश, झारखंड, नागपूरहून बरवे मंडळी आली होती. उल्लेखनिय म्हणजे अमेरिकेहून सौ. सुलोचना व पती देवदत्त पेंडसे खास संमेलनासाठी आले होते. सौ. पेंडसे या श्री. दिनकर द. बरवे यांच्या कनिष्ठ भगिनी आहेत. त्या अमेरिकन नागरिक आहेत.

संमेलनासाठी सर्व लोकांनी भरघोस मदत केली. उदा. श्री. विश्वास विष्णु, श्री. प्रमोद माधव, श्री. प्रशांत संजय, सौ. वसुंधरा जोग-बरवे, श्री. विद्याधर पावणस्कर, श्री. प्रशांत दिनकर व जान्हवी अनिरुद्ध.

**–श्री. दिनकर दत्तात्रेय बर्वे - नाशिक**

# आपले कुलदेव आणि कुलदेवी येथील निवासाबद्दल माहिती

कोळथरे येथील श्रीदेव कोळेश्वर आणि आंबेजोगाई येथील श्रीयोगेश्वरीदेवी ही आपली बर्व्यांची कुलदैवते आहेत. प्रत्येकाने वर्षातून एकदा वरील दोनही ठिकाणी जाऊन आपल्या कुलदेवतेचे दर्शन घ्यावे असे आहे. कांही मंडळी त्याप्रमाणे जात असतात. तर कांहीजण शुभकार्यानंतर कुलदेवतांचे दर्शन घ्यायला जातात. सर्वांच्या सोयीसाठी म्हणून वरील दोनही ठिकाणी असलेल्या सोयी आणि तेथील संपर्क खाली देत आहोत.

**१) कुलदेव -** श्री कोळेश्वर देवस्थन, कोळथरे, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी, दापोलीपासून अंदाजे २५ ते ३० कि.मी. वर आहे. अतिशय सुंदर  समुद्र किनारा असलेले गांव. येथे देवस्थान समितीचे भक्त निवास आहे. तेथे रहाण्याची व जेवणाची सोय होऊ शकते.

**संपर्क– कोळथरे श्री. नंदू दातार :**
दूरध्वनी क्र. ०२३५८२८५३०४, भ्रमणध्वनी क्र. ०९४०३०७४९२९.

**सोमणगुरुजी –**दुरध्वनी क्र. ०२३५८२८५२३९, तसेच दापोली, जालगांव, इतर ठिकाणी
राहण्याची अनेक हॉटेल्स आहेत. आजूबाजूलाही अनेक निसर्गरम्य स्थळे आहेत. उदा. आंजर्ले, केळशी, मुरुड वगैरे.

**२) कुलदेवी -** श्री देवी योगेश्वरी देवस्थान, अंबेजोगाई, ता. परळी, जि. बीड, सर्व चित्पावन ब्राह्मणांची कुलदेवी श्रीयोगेश्वरी देवी आहे. त्यामुळे अलिकडेच चित्पवान ब्राह्मण संघातर्फे अंबेजोगाई अथवा अंबेजोगाई येथे भक्तनिवास न्यास स्थापन करुन एक चांगले भक्तनिवास अंबेजोगाईच्या देवळाजवळ बांधण्यात आलेले आहे. तसेच शहर लहान असूनही अतिशय चांगली राहण्याची सोय या भक्तनिवासात करण्यात आली आहे.

मुंबई, ठाणे, पुणे येथील बर्वे मंडळी लातूर एक्सप्रेसने रेल्वे गाडीने लातूरला जाऊन बस अथवा मोटारगाडीने अंबेजोगाईला जाऊ शकतात. आधी संपर्क साधला तर लातूर-अंबेजोगाई-लातूर अशी कार सशुल्क प्रवासाची सोय करुन देतो असे भक्त निवासाचे व्यवस्थापक श्री. फड यांच्या बोलण्यात आले. भक्त निवासात जेवण आणि न्याहारीची व्यवस्था सौ. सोमण आणि सौ. जोशी बघतात. अगदी घरगुती स्वरूपाच्या आणि चांगल्या जेवणाच अनुभव आम्ही तिथे घेतला आहे. सौ. सोमणकरांशी बोलणे झाल्याप्रमाणे आधी त्यांच्याशी संपर्क साधल्यास त्या अभिषेक, नैवद्य, बोडण इत्यादींची सोय करुन देतात.

**संपर्क :** भक्तनिवास दूरध्वनी क्र. ०२४४६२०६३०८,
**व्यवस्थापक** श्री. फड यांचा दूरध्वनी क्र. ०९७६५९६१११३,
**भोजन व्यवस्था** सौ. सोमण- भ्रमणध्वनी - ०८८८८९४०२७०,
सौ जोशी - भ्रमणध्वनी - ०८८०५०९८५५०

# बर्वे कुल स्नेह संवर्धक मंडळ

## केंद्र कार्यकारी मंडळ

## ( सन २०१६ ते २०१९ )

| | | | |
|---|---|---|---|
| (०१) धनंजय रामकृष्ण बर्वे, | अध्यक्ष | पुणे | ९८२३०३६८८२ |
| (०२) नंदकुमार रामचंद्र बर्वे | उपाध्यक्ष | ठाणे | ९९६७६५२८३१ |
| (०३) बाळकृष्ण गजानन बर्वे | उपाध्यक्ष | पुणे | ७५८८२३४२२० |
| (०४) अनिल विनायक बर्वे | उपाध्यक्ष | जालगांव | ९३२३९७१७९७ |
| (०५) अंजली दिलीप बर्वे | कोषाध्यक्ष | ठाणे | ९२२४२४८६०७ |
| (०६) प्रकाश गजानन बर्वे | कार्यवाह | पुणे | ९८३३७३४५७० |
| (०७) केदार विठ्ठल बर्वे | सह कार्यवाह | पुणे | ९१५८८०२६६६ |
| (०८) संजय रमेश बर्वे | सदस्य | कांजुरमार्ग | ९९३०००५९३५ |
| (०९) जयेश मधुकर बर्वे | सदस्य | ठाणे | ९८६९४३९४२१ |
| (१०) विनायक वसंत बर्वे | सदस्य | बडोदा | ९८२४०२५९८१ |
| (११) रामानंद पुरुषोत्तम बर्वे | सदस्य | इगतपुरी | ९२२६७०३३३२ |
| (१२) विजय रामचंद्र बर्वे | सदस्य | विलेपार्ले | ९८९२७२१३२५ |
| (१३) श्रीहरी शरदचंद्र बर्वे | सदस्य | कल्याण | ९८२०९८०७५९ |
| (१४) अनिता संजीव गोखले-बर्वे | सदस्य | बडोदा | ९८२४०८४६६४ |
| (१५) चंद्रशेखर जयंतराव बर्वे | सदस्य | डुबेरे | ९४२१९१२२१४ |
| (१६) मिलिंद मुरलीधर बर्वे | सदस्य | ठाणे | ८१०८११६६११ |
| (१७) नरेंद्र रामकृष्ण बर्वे | सदस्य | जालगांव | ८५५४९५३२७७ |
| (१८) मृदुला प्रशांत बर्वे | सदस्य | नाशिक | ९०२८९४२५९२ |
| (१९) राजेंद्र गोपाळ बर्वे | सदस्य | गोवा | ९७६३७२५९४४ |

# गुजरात शाखा- हळदीकुंकू समारंभ वृत्तांत...

दि. २१/०१/२०१७ रोजी गुजरात शाखेचा हळदीकुंकू व तिळगूळाचा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरवात श्री अंबेजोगाई व श्रीकोळेश्वराच्या प्रार्थनेने झाली.

गुजरात शाखेचे अध्यक्ष श्री. प्रभाकर बर्वे ह्यांनी नाशिकमध्ये झालेल्या संमेलनाची माहिती दिली. व श्री. दिनकर बर्वे ह्यांनी स्वतः शिवून दिलेल्या पिशव्या सर्व उपस्थित असलेल्या सभासदांना वाटल्या व त्यांचे कौतुक केले व आभार मानले.

तसेच गुजरात शाखेच्या कार्यकारी मंडळामध्ये बदल करुन सौ. मनिषा राजू बर्वे, सहकार्यवाह व संतोष गणेश बर्वे, खजिनदार म्हणून सर्वांनी मिळून नेमणूक करण्यात आली. सौ. अनिता गोखले-बर्वे, सौ. शर्वरी सतिश बर्वे व विनायक (योगेश) बर्वे कायम निमंत्रित जाहिर करण्यात आले. पुणे येथे झालेल्या मिटींगची माहिती दिली व येणाऱ्या वर्षी जर बडोद्याला संमेलन झाले तर आपणा सर्वांचे सहकार्य व आर्थिक मदतही लागेल. वार्षिक वर्गणी रु. २००/- करण्यात यावी असे सांगून सभासदांनी त्यास आनंदाने होकार दिला. तद्नंतर सर्व सभासदांचे आभार मानले.

गुजरात शाखेचे उपाध्यक्ष श्री. सुरेंद्र बर्वे ह्यांनी सर्व सभासदांना सांगितले की, प्रत्येकाकडे वाढदिवस, लग्न किंवा काही शुभकार्य झाले की आपल्या मंडळास फुल नाही फुलाची पाकळी देऊन हातभार लावावा तसेच श्री. राजेंद्र बर्वे (कार्यवाह) ह्यांना गेल्या वर्षी सर्व सभासदांना वाढदिवसाचे कार्ड टाईमशीर पाठविले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

सौ. कल्पना क्षिरसागर व श्रीमती सुहासिनी बर्वे ह्यांनी अभंग व भावगीतं म्हटले. त्यानंतर सर्वांना तिळगूळ दिला. बायकांनी हळदीकुंकू देवून आवा वाटला. मग अल्पहार झाला. (गुजरातचे ऊंधीउ व जिलबी) कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सौ. रेखा राजेंद्र बर्वे व त्यांच्या स्नेही यांनी संक्रांतीचे महत्व काळ्या साड्या का घालाव्यात ह्याची माहिती फार छान सांगितली.

**प्रभाकर बर्वे, अध्यक्ष - गुजरात**

## कल्याण - डोंबिवली परिसर शाखा- संक्रात समारंभ वृत्तांत...

कल्याण-डोंबिवली परिसर शाखेचा समारंभ, डोंबिवलीचे श्री. उदय लक्ष्मण बर्वे, “मनिषा”, पेंडसेनगर, डोंबिवली (पूर्व) येथे दिनांक २९ जानेवारी २०१७ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत साजरा करण्यात आला.

प्रथम कुलदेव व कुलदेवी यांच्या प्रतिमांचे पूजन झाले. नंतर चहापानाचा कार्यक्रम व महिलांचा हळदीकुंकू समारंभ पार पडला. करमणुकीचा विशेष कार्यक्रम नव्हता. गप्पा मारणे हाच कार्यक्रम होता. श्रीमती साधना बर्वे यांनी १०व्याला कावळ्याचे महत्व का हे “गंगालहरी” मधील गोष्ट सांगून माहिती दिली. नंतर खिचडी, सोलकडी, पोळ्या, वांग्याचे भरीत व गुळपोळी असा जेवणाचा बेत होता. दुपारी २ ला कार्यक्रम संपला.

---

## पुणे शाखा- हळदीकुंकू समारंभ वृत्तांत...

बर्वे कुलस्नेह संवर्धक मंडळाच्या पुणे शाखेचा तिळगूळ समारंभ दि. २१ जानेवारी २०१७ रोजी त्रिदल हॉल, करिष्मा चौक, कोथरूड, पुणे येथे संपन्न झाला. केंद्रीय मंडळाचे अध्यक्ष श्री. धनंजय बर्वे पुणे शाखेचे अध्यक्ष श्री.पुरुषोत्तम बर्वे, केंद्रिय उपाध्यक्ष श्री. बाळकृष्ण बर्वे यांचे हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर सौ. सीमा बर्वे ह्यांनी भारतमातेचे स्वागत गीत म्हटले नंतर नॅशनल बॅटमिंटन चॅम्पियनशिप मिळविल्याबदल कु. पूर्वा बर्वे हिचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला नुकताच न्यु इंग्लिश स्कूल रमणबाग शाळेच्या पटांगणावर नवीन मराठी शाळा व रमणबाग शाळेतील मुलांनी बसविलेला गीत रामायणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्या कार्यक्रमातील श्रीराम व लक्ष्मणाची भूमिका केलेल्या अनुक्रमे चिन्मय व तेजस बर्वे यांचाही भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. नंतर डॉ. सौ. प्राजक्ता मोडक या केळकर हॉस्पिटल, घोले रोड, पुणे येथे नेत्रतज्ञ म्हणून काम करीत असून बुबुळावर अधिक संशोधन करीत आहेत. त्यांनी डोळ्याची घ्यावयाची काळजी व लहान मुलांना लागणारा चष्मा याबद्दल सविस्तर विवेचन केले. व श्रोत्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. त्यानंतर श्री. श्रीकांत व सौ. मृणाल साने यांनी “विडंबनात्मक काव्याची मिसळ” हा खुसखुशीत कार्यक्रम सादर केला. शेवटी तिळगूळ वाटप व अल्पोपहार होऊन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास सुमारे ६५ मंडळी हजर होती.

**पुरुषोत्तम बर्वे, अध्यक्ष - पुणे**

---

## विवाह योग

श्री. श्रीहरी बर्वे, कल्याण यांचा मुलगा लग्नाचा असून त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**मुलाचे नांव – श्रीरंग श्रीहरी बर्वे**, जन्म तारीख – ०१/०६/१९८७, ठाणे /कल्याण.

शिक्षण – ExTc Engineer, Software IT

Fumatele (पुणे ) येथे नोकरी. पुण्यात वास्तव्य असते.

अपेक्षा – मुलगी नोकरी करणारी, सुंदर, मनमिळावू, कोणत्याही ब्राह्मण शाखेतील चालेल.

मुलाला मंगळ नाही. मुलीची कुंडली, फोटो पाठवावा.

संपर्क – **श्री. श्रीहरी बर्वे**, **Mobile No. : 9820980759**

# कै. शरदचंद्र बर्वे, कल्याण यांची जन्म शताब्दी सांगता-

आपल्या बर्वे मंडळाचे सभासद व आता केंद्रीय कार्यकारी मंडळात समाविष्ट झालेले कल्याणचे श्री. श्रीहरि बरवे यांचे वडील कै. शरदचंद्र बर्वे ऊर्फ शरुमामा बर्वे यांचे जन्मशताब्दी वर्ष २०१५-२०१६ या काळात साजरे झाले. त्यांच्या या जन्म शताब्दी वर्षाची सांगता कार्यक्रम दि. ४ डिसेंबर २०१६ रोजी संध्याकाळी कल्याणच्या बालकमंदिर शाळा, दत्तआळी, टिळक चौक, कल्याण येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. हा कार्यक्रम कल्याणच्या काव्यकिरण मंडळातर्फे साजरा करण्यात आला.

कै. शरदचंद्र बर्वे हे कल्याण मध्ये शरुमामा म्हणूनच प्रसिद्ध होते. श्रीमंत नसूनही त्यांना लेखन, कविता, गाण्याची आवड होती. त्या काळात त्यांनी मासिक छापण्यास सुरवात केली व बरेच वर्ष अंक प्रसिद्ध केले. मासिक छापण्याचा उद्देश हा की, कल्याणातील लेखक, कवींना वाव मिळावा.

या सांगता कार्यक्रमास ज्येष्ठ कवि श्री. सालंकूरकर प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या वृद्ध प्रेक्षकांनी जे प्रत्यक्ष त्यांच्याबरोबर होते त्यांनी शरुमामांच्या हृद आठवणी सांगितल्या. शरुमामांबरोबर श्रीमती शर्वरी मामी ( शरदचंद्र बर्वे यांच्या पत्नी) यांच्याही खूप आठवणी सांगितल्या. शर्वरीमामींच्या सहभागामुळे शरुमामा आपला छंद, हौस जोपासू शकले. पाहुण्यांनी दरवर्षी शरुमामांच्या स्मृतीस जागृत ठेवण्यासाठी असाच कार्यक्रम त्यांच्या जन्मदिनी साजरा करावा असे सुचविले व उपस्थित असलेल्या सर्व श्रोत्यांनीही या कल्पनेस प्रतिसाद दिला. नंतर अल्पोपहार आणि चहा होऊन सुश्राव्य गाण्याचा कार्यक्रम नाट्यगीते, भक्तीगीते, भावगीते सादर करुन कार्यक्रम संपला.

वडीलांप्रमाणेच श्री. श्रीहरी बर्वे हे हौसी आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी अनेक बरोबरीचे तसेच तरुण पिढीतील कवि, गायक यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांचे गायन सादर करण्यास उत्तेजन दिले.

स्वतः श्री. श्रीहरी बर्वे यांनी गायन सादर केले तसेच श्री. वसंतराव घारपुरे, श्री. धनंजय जोशी (नेरळ) तसेच श्रीहरींबरोबर बँकेत काम करणारे देवेद्र, गौतम जाधव, प्रदीप भागवत, केदार जोशी वगैरे यांनी नांदीं, नाट्यगीते, भक्तीगीते, भावगीते सादर केली. शेवटी सौ. शिल्पा पटवर्धन यांनी श्रीस्वामी समर्थांचे भजन व भैरवी गाऊन कार्यक्रम १० वाजतांचे सुमारास संपला.

आपल्या मंडळांतर्फे कै. शरुमामांना आदरांजली. श्री. श्रीहरि बर्वे यांनी असेच नव्या गायकांना आपली कला सादर करण्यास वाव मिळण्यासाठी दरवर्षी असा कार्यक्रम साजरा करावा ही आग्रहाची विनंती आपल्या मंडळातर्फे श्री. गजाननराव बर्वे व श्री. उदय बर्वे हे डोंबिवलीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

**-श्री. उदय लक्ष्मण बर्वे, डोंबिवली.**

# चमकते तारे सन २०१६

## निबंध स्पर्धा सप्टेंबर २०१६ ते नोव्हेंबर २०१६

### सौ. सविता दत्तात्रय बर्वे, रत्नागिरी

| अ.नं. कोणामार्फत | विषयाचे नांव | क्रमांक | बक्षीसाचे स्वरुप | कोणत्यास्तरावर | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) नगरपालिका, रत्नागिरी | समग्र टिळक | तृतीय | रोख रक्कम, प्रशस्तीपत्र | जिल्हा | ऑगस्ट २०१६ |
| (२) भंडारी ज्ञाती समाज रत्नागिरी | शिवरायांचे आरमार | उत्तेजनार्थ | प्रशस्तीपत्र, पुस्तक | जिल्हा | सप्टेंबर २०१६ |
| (३) ज्येष्ठ नागरिक संघ, रत्नागिरी | महाराष्ट्राच्या जडण घडणीत संतांचे योदान | प्रथम | शील्ड, रोख रक्कम, प्रशस्तीपत्र | जिल्हा | ऑक्टोबर २०१६ |
| (४) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पुणे. | डॉ. आंबेडकर | उत्तेजनार्थ | रोख रक्कम, पुस्तके, प्रशस्तीपत्र | राज्य | नोव्हेंबर २०१६ |

## वक्तृत्व स्पर्धा जानेवारी २०१६ ते ऑगस्ट २०१६

### कु. अवनी मयुरेश आठवले इ. ८ वी शाळा जी.जी.पी.एस्. रत्नागिरी

| अ.नं. कोणामार्फत | विषयाचे नांव | क्रमांक | बक्षीसाचे स्वरुप | कोणत्यास्तरावर | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) स्वामी स्वरूपानंद संस्था पावस, रत्नागिरी | पसायदान | तृतीय | शील्ड, रोख रक्कम, प्रशस्तीपत्र | जिल्हा | जानेवारी २०१६ |
| (२)माध्यमिक अध्यापक संघ, रत्नागिरी | कथाकथन आईचे डोळे | प्रथम | शील्ड, रोख रक्कम, प्रशस्तीपत्र | तालुका व जिल्हा | जानेवारी २०१६ |
| (३) नगरपालिका, रत्नागिरी | टिळकांची चतु:सूत्री | द्वितीय | शील्ड, रोख रक्कम, प्रशस्तीपत्र | जिल्हा | ऑगस्ट २०१६ |

### कु. अद्वैत राहुल बर्वे इ. ४ थी परशुरामपंत अभ्यंकर प्राथ. विद्यामंदिर, रत्नागिरी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) गुरुकुल बहुउद्देशीय संस्था, जळगांव | MTS | द्वितीय (केंद्रात ) | प्रशस्तीपत्र | जिल्हा | एप्रिल २०१६ |
| (२) नगरपालिका, व शाळा रत्नागिरी | टिळकांचे बालपण | तृतीय | प्रशस्तीपत्र | जिल्हा | ऑगस्ट २०१६ |

# या वर्षीचे संमेलन " सांगली " येथे सप्टेंबर महिन्यात होणार

दरवर्षी आपल्या मंडळाचे संमेलन वेगवेगळ्या ठिकाणी होत असते. आतापर्यंत मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, नाशिक, कोळथरे, बडोदा, गोवा व अंबेजोगाई इत्यादी ठिकाणी दोन-तीन वेळा संमेलन झालेली आहेत. नेहमीपेक्षा वेगळे ठिकाण म्हणून सांगली या ठिकाणी संमेलन घ्यावे असा विचार पुढे आला. त्यानिमित्ताने सातारा, सांगली आणि कोल्हापूर आदी भागातील बर्वे मंडळी एकत्र येतील. जवळच्या बेळगांव आणि गोव्यामधील बर्वे मंडळीही संमेलनाला उपस्थित राहू शकतील. त्यावर कार्यकारिणीत चर्चाही झाली. स्थानिक बर्वे मंडळींशी बोलणे झाले. सांगलीतील कांही बर्वे मंडळींनी भेटून चर्चा केली आणि त्यांनी संमेलन घेण्याबद्दल होकार कळविला.

सप्टेंबर २०१७ मध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात सांगली येथे संमेलन घ्यायचे नक्की झाले आहे. सांगली-कोल्हापूर भागात बर्वे मंडळी जास्त नाहीत तरी आपण सर्व बर्वे मंडळींनी पुढाकार आणि सहभाग घेऊन हे संमेलन यशस्वी करायचे आहे. नेहमीप्रमाणे आपल्या सर्वांचे सहकार्य लाभेल याची कार्यकारी मंडळाला खात्री आहेच. संमेलन तारीख आणि कार्यक्रम याविषयी सविस्तर माहिती पुढील कुलवार्तात येत राहील.

–श्री. धनंजय रामकृष्ण बर्वे
अध्यक्ष
बर्वे कुलस्नेह संवर्धक मंडळ

---

## दुःखद निधन वार्ता

सौ. प्राची ज्ञानेश्वर बर्वे, श्रीसहवास / पॉम अेकर्स ह्यांचे वयाच्या ३८ व्या वर्षी दि. १८ जानेवारी २०१७ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या सौ. व श्री. गोपाळराव बर्वे ह्यांची स्नुषा होत. त्यांच्या तरुण वयात जाण्याने सर्व कुटुंबामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली. सर्व बर्वे कुटुंबिय त्यांच्या दुःखात सहभागी आहेत.

## नवीन सभासद यादी १ एप्रिल ते ३० जून २०१६

**आधारस्तंभ**

१२०३ - निहार मिलिंद बर्वे, पुणे.
१२०४ - प्रकाश वामन बर्वे, पुणे.
१२०५ - मृदुला मुकुंद बर्वे, पुणे.
१२०६ - मकरंद वसंत बर्वे, पुणे.
१२०७ - सावनी जितेंद्र बर्वे, पुणे.
१२०८ - हेमांगी अक्षय बर्वे, बडोदा.
१२०९ - वैशाली सुधीर साने -बर्वे, दौंड
१२१० - वैजयंती कुमार बर्वे, पुणे
१२११ - कुमार भार्गव बर्वे, पुणे.
१२१२ - दिलीप सिताराम बर्वे, बडोदा.
१२१३ - अंजली दिलीप बर्वे, बडोदा.
१२१४ - आनंद भास्कर बर्वे, पुणे.
१२१५ - डॉ. सौ.ऋचा आनंद बर्वे, पुणे.
१२१६ - प्रणव सुभाष बर्वे, पुणे.
१२१७ - सुभाष विनायक बर्वे, पुणे.
१२१८ - स्नेहल रमेशचंद्र बर्वे, पुणे.
१२१९ - अनुजा गौरव दातार -बर्वे, पुणे.

**आश्रयदाता**

५२५ सुधा माधव साठे -बर्वे, विलेपार्ले.
५२६ जयश्री महेंद्र लिखते -बर्वे, विलेपार्ले
५२७ तनया रमेशचंद्र बर्वे, पुणे.

## नवीन सभासद यादी १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१६

**आधारस्तंभ**

१२२० - सेजल सौरभ बर्वे, नाशिक.
१२२१ - वरद सखाराम बर्वे, आपटा.
१२२२ - भुषण बर्वे, पुणे.
१२२३ - वैष्णवी भुषण बर्वे, पुणे.
१२२४ - आदिश अनिल बर्वे, पुणे.
१२२५ - अतुल मधुकर बर्वे, अमेरिका.
१२२६ - अजय मधुकर बर्वे, अमेरिका.
१२२७ - अक्षया अरविंद बर्वे, रत्नागिरी.
१२२८ - नेहा अरविंद बर्वे, रत्नागिरी.

## १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१६ कालावधीत जमा झालेल्या देणग्या

**शिक्षण निधी**

(१) योगिता चितळे - बर्वे, विलेपार्ले रु. ५,०००/-
(२) प्रभाकर दत्तात्रय बर्वे, इंदौर रु. १०००/-
(३) पद्माकर दत्तात्रय बर्वे, इंदौर रु. ३००/-

**एकूण रु. ६,३००/-**

**उद्योजक निधी**

(१) नीला माधव बर्वे, ठाणे रु. १०,०००/-
(२) निशा नंदकुमार बर्वे, ठाणे रु. २१,०००/-

**एकूण रु. ३१,०००/-**

**कुलवार्ता निधी**

(१) सौ. अनघा गोखले - बर्वे, ठाणे रु. ५०००/-

**एकूण रु. ५०००/-**

# वार्षिक स्नेह संमेलन २०१६



आदर्श कार्यकर्ती पुरस्कार -
सौ. नीला विद्याधर पावणस्कर-बरवे



आदर्श कार्यकर्ता पुरस्कार
श्री. पराग रामानंद बर्वे




कुलरत्न पुरस्कार - श्री. दिनकर द. बरवे
यांना डॉ. बर्वे ह्यांच्या शुभहस्ते



अन्नपुर्णा सन्मान- सौ. जया मनोहर बरवे




सन २०१६-२०१९ करितां नियुक्त
नवीन कार्यकारी मंडळ




नाशिक मधील कार्यकर्त्यांचा सत्कार

**संपादक :**

**श्री. उदय लक्ष्मण बर्वे**

५०१, मनिषा बिल्डिंग, श्री मनिषा को.हौ.सोसायटी,
व्ही.पी.रोड, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.
भ्रमणध्वनी : ०९८६९७१२६६७

## कुलवार्ता संपादक सल्लागार मंडळ

श्री. अशोक प्रमोद बर्वे, डोंबिवली

सौ. मृणाल विद्याधर पावणस्कर, नाशिक

सौ. स्वाती शरद बर्वे, मुलुंड

श्री. नरेंद्र सुधाकर बर्वे, अंधेरी

Please undeliver return to :

**कुलवार्ता टपाल व्यवस्था :**

**प्रकाश गजानन बर्वे**

२०१, मुग्धा सोसायटी, कोथरुड बस स्टँड मागे,
कर्वे रोड, पुणे - ४११ ०३८.
मो. ९८३३७३४५७०

सभासदांचे दुरध्वनी क्रमांक, पत्ता अथवा पिनकोड बदलला असल्यास वरील पत्त्यावरती अथवा दूरध्वनी वरुन संपर्क साधून त्वरीत कळवावे म्हणजे अंक व वार्षिक अहवाल योग्य पत्त्यावर पाठविता येईल.


# "सप्तशती ज्वेलर्स"

(समस्त बर्वे मंडळींची हक्काची पेढी)

कै. शंकर काशिनाथ बर्वे ( उपाख्य राजाभाऊ बर्वे) बर्वे आळी, जालगांव
यांच्या कृपाशिर्वादाने दैदिप्यमान यशाकडे वाटचाल करणारी पेढी
दुकान क्र. ५०७, बी-३, कस्तुरी प्लाझा सोसायटीचे ऑफिसच्या जवळ,
डोंबिवली (पूर्व) - ४२१ २९४०.
फोन : २८६ ३५१२ / निवास : २४५ २९४०

नम्र सुचना आपल्या सर्व नातेवाईक व मित्र मंडळींना आमच्या पेढीचे नाव अवश्य सूचवावे.




**श्री. सुबोध भावे ह्यांचे समवेत बर्वे युवा मंडळी**

प्रति,

बुक-पोस्ट

आजिव / आस्तंभ / आश्रय / स. स. क्र.

श्री. / श्रीमती ______________________

______________________


**हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक श्री. उदय लक्ष्मण बर्वे यांनी बर्वे कुल स्नेहसंवर्धक मंडळाकरिता ठाणे जिल्हा सहकारी मुद्रण व प्रकाशक संस्था, ठाणे (प.) येथे छापून श्री. मधुसूदन बर्वे , ३०१-अे, मांगल्य, मुलुंड (पूर्व) ४०० ०८१. येथे प्रसिद्ध केले.**